MHGA050008072022

# न्यायालय विद्यमान न्यायदंडाधिकारी (प्रथम श्रेणी) देसाईगंज

**(न्यायाधीश : आ.ऋ. भडके)**

**किरकोळ फौजदारी अर्ज क्रं.–१३८/२०२२**
**(CNR-MHGA050008072022)**

| | |
|---|---|
| **अर्जदार** | **१. श्री दिपक नानाजी पिलारे,**<br>वय अंदाजे –४७ वर्षे, धंदा– मजुरी,<br>राहणार–विर्शी वार्ड, देसाईगंज,<br>तहसिल – देसाईगंज, जिल्हा– गडचिरोली.<br>**२. श्री नेताजी आबाजी दुफारे,**<br>वय अंदाजे –३८ वर्षे, धंदा– मजुरी,<br>राहणार–एकलपुर,<br>तहसिल – देसाईगंज, जिल्हा– गडचिरोली.<br>**३. मोहम्मद खालिद अ. ह कुरेशी**<br>वय अंदाजे –४५ वर्षे, धंदा– मजुरी,<br>राहणार–राजेंद्र वार्ड, देसाईगंज,<br>तहसिल – देसाईगंज, जिल्हा– गडचिरोली.<br>**४. मोहम्मद साजिद जियाउल कदीर शेख,**<br>वय अंदाजे –३४ वर्षे, धंदा– मजुरी,<br>राहणार–जुनी वडसा चव्हाण वार्ड, देसाईगंज,<br>तहसिल – देसाईगंज, जिल्हा– गडचिरोली.<br>**५. श्री संदिप नारायण ढोंगे,**<br>वय अंदाजे –३५ वर्षे, धंदा– मजुरी,<br>राहणार–चिखलगांव,<br>तहसिल – ब्रम्हपुरी, जिल्हा– चंद्रपुर.<br>**६. श्री चैतनदास अन्नाजी विधाते,**<br>वय अंदाजे –४२ वर्षे, धंदा– मजुरी,<br>राहणार–नैनपुर वार्ड, देसाईगंज,<br>तहसिल – देसाईगंज, जिल्हा– गडचिरोली.<br>**७. श्री आशिष दुर्योधन घोरमोडे,**<br>वय अंदाजे –३२ वर्षे, धंदा– मजुरी,<br>राहणार–नैनपुर वार्ड, देसाईगंज, |

| | |
|---|---|
| | तहसिल – देसाईगंज, जिल्हा– गडचिरोली.<br>**८. श्री देवानंद नानाजी ठाकरे,**<br>वय अंदाजे –४२ वर्षे, धंदा– ठेकेदारी,<br>राहणार–हनुमान वार्ड, देसाईगंज,<br>तहसिल – देसाईगंज, जिल्हा– गडचिरोली. |
| **– वि रु ध्द –** | |
| **गैरअर्जदार** | महाराष्ट्र शासन तर्फे<br>पोलीस स्टेशन, देसाईगंज,<br>तालुका–देसाईगंज, जिल्हा–गडचिरोली. |

**फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ४५१ नुसार अर्ज**

---

अर्जदारातर्फे – विद्वान वकील श्री. एस.एस.गुरु,
गैरअर्जदारातर्फे – विद्वान सहाय्यक सरकारी वकील कु.नेहा ईलमुलवार,

---

**आदेश (निशाणी क्र.०१ वरील)**

(दिनांक १३ डिसेंबर, २०२२ रोजी पारित)

०१) अर्जदारांनी सदरचा अर्ज एकुण रक्कम रुपये ८५,४००/– चा ताबा मिळण्याकरीता दाखल केलेला आहे.

०२) अर्जदारांचे असे म्हणने आहे की, ते मौजा–देसाईगंज, जिल्हा–गडचिरोली येथील स्थायी रहिवासी आहेत. ते सदर मालमत्तेचे मालक असुन त्यांचे ताब्यातून पोलीसांनी सदरची रक्कम बळजबरीने काढुन घेवुन फौ. मा. क्रमांक ३११/२०१९, (सरकार–वि–दिपक नानाजी पिलारे व इतर दहा), महाराष्ट्र जुगार कायदाचे कलम १२ (अ) अन्वये तपास कामाकरीता जप्त केले असुन ती रक्कम न्यायालयात जमा केलेली आहे. परंतु आता सदरच्या मामल्याचा अंतीम निकाल लागला असुन सर्व अर्जदारांना निर्दोष सोडण्यात

आलेले आहे व अपिलाची मुदतसुध्दा संपलेली आहे. सदरहु रकमेची अर्जदारांना त्यांच्या कौटुंबिक गरजा भागविण्याकरीता आवश्यकता आहे.

०३) विद्वान सरकारी वकीलाचे असे म्हणणे आहे की, अर्जदार या रकमेचा उपयोग पुन्हा अशाच प्रकारच्या गुन्हयात करण्याची शक्यता आहे. त्याचप्रमाणे आरोपींनी त्यांचे फौ.प्र.सं.कलम ३१३ अन्वये निवेदनात त्यांच्या ताब्यातुन पोलीसांनी सदरची रक्कम जप्त केल्याचे कथन नाकारले आहे. सदर प्रकरणात जप्ती पंचनामा सिध्द झालेला नाही. त्यामुळे अर्जदारांना रक्कम देवु नये. तपासी अधिकारी यांनी मागणीप्रमाणे अर्जदारांना रक्कम देण्यास नाहरकत दर्शविली.

०४) उभय पक्षाचे कथन व दस्ताऐवजांचे अवलोकन केले अर्जदाराच्या विद्वान वकीलाचा व विद्वान सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांचा युक्तीवाद ऐकला.

०५) प्रस्तुत प्रकरणात मुळ संक्षीप्त फौजदारी प्रकरण क्र.३११/२०१९ चा अभिलेख बोलविण्यात आला. त्याचे अवलोकन करता पंचनाम्यात असे दिसुन येते की, सदरची रक्कम अर्जदारांकडुन पोलीसांनी तपासादरम्यान जप्त केली. मुळ प्रकरणातील पंच साक्षीदार फितुर झाल्याने पंचनामा सिध्द होवु शकला नाही. परंतु तपासी अधिकारी यांनी तयार केलेल्या जप्ती पंचनाम्यावरुन दिसुन येते की, अर्जदार दिपक नानाजी पिलारे यांच्या अंगझडतीत रुपये ८,०००/–, अर्जदार नेताजी दुफारे यांच्या अंगझडतीत रुपये ८,९००/–, अर्जदार मोहम्मद कुरेशी यांच्या अंगझडतीत रुपये १५,०००/–, अर्जदार मोहम्मद साजिद शेख यांच्या अंगझडतीत रुपये १२,२००/– अर्जदार संदीप ढोंगे यांच्या अंगझडतीत रुपये १३,५००/–, अर्जदार चैतनदास विधाते यांच्या

अंगझडतीत रुपये १८,०००/–, अर्जदार आशिष घोरमोडे यांच्या अंगझडतीत रुपये ४,५००/– व अर्जदार देवानंद ठाकरे यांच्या अंगझडतीत रुपये ५,३००/– असे जप्त करण्यात आले आहे. त्यावरुन सदरच्या रकमेवर अर्जदारांचा हक्क आहेत असे गृहित धरण्यास काहीही हरकत नाही. अपिल कालावधी संपलेला असल्यामुळे सदरची रक्कम न्यायालयात जमा ठेवण्यास कोणतेही उचीत कारण दिसुन येत नाही. सबब, अर्जदारांना सदरची रक्कमेचा ताबा देणे न्यायाच्या दृष्टीने उचित ठरेल. करीता मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे :–

## // आ दे श //

(०१) अर्जदार दिपक पिलारे यास रुपये ८,०००/–, नेताजी दुफारे यास रुपये ८,९००/–, अर्जदार मोहम्मद कुरेशी यास रुपये १५,०००/–, अर्जदार मोहम्मद साजिद शेख यास रुपये १२,२००/– अर्जदार संदीप ढोंगे यास रुपये १३,५००/–, अर्जदार चैतनदास विधाते यास रुपये १८,०००/–, अर्जदार आशिष घोरमोडे यास रुपये ४,५००/– व अर्जदार देवानंद ठाकरे यास रुपये ५,३००/– यांना खालील अटीवर देण्यात यावी :–

(i) अर्जदाराने रोख रकमेबाबत त्यांना देण्यात येणा–या रकमेइतके सुपूर्तनामा बंधपत्र सादर करावे.

(ii) सहायक अधिक्षक (वित्त) यांना निर्देशित करण्यात येते की, अर्जदारांची योग्य प्रकारे ओळख पटवुन आदेशाप्रमाणे सदरची रोख रक्कम त्यांना सुपुर्द करावी.

Digitally signed by anandrao rushi bhadke
Date: 2022.12.13 15:30:47 +0530

(आ.ऋ. भडके)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
देसाईगंज.

स्थळ : देसाईगंज.
दिनांक : १३/१२/२०२२